रु.१० लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना
ई-निविदा कार्यप्रणाली लागू करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्रमांक : मातंसं/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३ /३९
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १९ जानेवारी, २०१३

**वाचा** :- शासन निर्णय क्रमांक : मातंसं/नस्ती-२०१०/प्र.क्र.३४/३९, दि. ६ ऑगस्ट, २०१०

**प्रस्तावना** : -

शासनाची विकास कामे, सेवा, वस्तुंची खरेदी इत्यादी बाबींसाठी संपूर्ण राज्यामध्ये रु.५० लाख किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाच्या कामांकरिता दिनांक ६ ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयानुसार ई-निविदा प्रकल्प राबविण्यास प्रारंभ झाला आहे. त्यासाठी सिफी नेक्स टेंडर्स (Sify Nex Tenders) या सिस्टिम इंटिग्रेटरशी झालेल्या करारान्वये त्यांची ५ वर्षांसाठी निवड करण्यात आलेली आहे. सिफी नेक्स टेंडर्स यांनी ई-निविदा प्रकल्पांतर्गत शासनाचे विभाग, उपविभाग, आयुक्तालये, संचालनालये, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती अशी विविध कार्यालये मिळून एकंदर ५१ शासकीय आस्थापनांसाठी ई-टेंडरिंगच्या सेवा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. आतापर्यंत सिफीकडून २६ जुलै, २०१२ पर्यंत ३७०८ ई-टेंडर्स प्रसिद्ध केले व त्यापैकी २२४७ निविदांच्या प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.

दरम्यान केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी NIC च्या कार्यप्रणालीचा अवलंब करण्याचा शासन गांभिर्याने विचार करीत होते व त्यास अनुसरुन ग्रामविकास विभाग व माहिती तंत्रज्ञान संचालनाय यांचेकडील काही निविदा प्रायोगिक तत्वावर NIC च्या कार्यप्रणालीद्वारे यशस्वीरित्या राबविल्या गेल्या. सदर प्रतिसाद लक्षात घेऊन जून, २०१२ अखेर ६९० निविदा NIC च्या कार्यप्रणालीद्वारे शासनाने www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या आहेत. यावरुन NIC ची ई-निविदा प्रक्रिया उपयुक्त ठरत असल्याचे दिसून येत आहे.

वरील बाबी विचारात घेऊन सद्यस्थितीत सिफी नेक्स टेंडर्स व NIC या दोन्ही ई-निविदा कार्यप्रणाली उपयोगात आणून रु.१० लाख किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाच्या बाबींसाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा संपूर्ण राज्यात अवलंब करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

उपरोक्त पार्श्वभूमीवर शासन असा निर्णय घेत आहे की, ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत NIC (National Informatics Centre) आणि सिफी नेक्स टेंडर्स या दोन्ही ई-निविदा कार्यप्रणालींचा वापर करावा व जास्तीत जास्त ई-निविदा NIC च्या कार्यप्रणालीद्वारे प्रसिद्ध करण्यात याव्यात. सर्व विभागांनी **रु.१० लाख किंवा त्यापेक्षा अधिक मूल्यांच्या निविदांसाठी** दिनांक १ फेब्रुवारी, २०१३ पासून ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करावा.

ई-टेंडरिंग प्रणालीविषयी माहिती, अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, सादरीकरण इत्यादी बाबतीत संपर्क साधण्यासाठी खालील विवरणपत्रात माहिती देण्यात येत आहे.

.....२/-

| NIC | Sify Nex Tenders |
|---|---|
| दूरध्वनी क्रमांक : १८००२३३७३१५ (Toll Free)<br>ई-मेल : eproc.support@maharashtra.gov.in<br>संकेतस्थळ : www.mahatenders.gov.in | दूरध्वनी क्रमांक :०२०-२५३१५५५५<br>Mobile No. :९१६७९६९६०१/०४<br>ई-मेल : support.gom@nextenders.com<br>संकेतस्थळ : www.maharashtra.etenders.in |
| **DIT (माहिती तंत्रज्ञान संचालनालय)** | |
| Nodal Officer E-Procurement/ Project Consultant E-Procurement :<br>ई-मेल : eproc.support@maharashtra.gov.in<br>दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२८१७९९० फॅक्स ०२२-२२०४४५८६ | |

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३०११६१२१०३५२०११ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(जयंत कुमार बाँठिया)**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
सचिव, राज्य निवडणूक आयोग (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई (पत्राने),
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२ ( लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर
अधिदान व लेख अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सा.प्र.वि. कार्यासन-३९
सर्व मंत्रालयीन विभाग,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख